# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

## <u>स्थायी समिती सभा दि. ०५/०७/२००३.</u>

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शनिवार दिनांक ०५/०७/२००३ रोजी सभा सुचना क्र. १० दि. ०१/०७/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन म. पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### <u>उपस्थित सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन म. पाटील | सभापती |
| २) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ५) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ६) | श्री. वैती चंद्रकांत सिताराम | सदस्य |
| ७) | श्री. तुळशीदास दत्तू म्हात्रे | सदस्य |
| ८) | श्री. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ९) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| १०) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ११) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| १२) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १३) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| १४) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| १५) | श्रीम हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ पुजा प्रताप शिंदे | सदस्या |

### <u>गैरहजर सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |

**मा. सभापती:-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरुवात करावी.

(सभापतींच्या संमतीने प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ८८ चे वाचन केले.)

**मा. सभापती:-**

महानगरपालिका स्थापन झाल्यापासुन नवनवीन अधिकारी पदमंजुरीने येत आहेत. आज नगररचनेमध्ये श्री. शेंडे हे आले आहेत. त्यांचे मी ह्या सभेत स्वागत करतो.

**चंद्रकांत वैती:-**

दि. २८/५/०३ च्या इतिवृत्तांत पान क्र. ५ वर चर्चा केली होती. लायसन्स आपण त्यांना देणार आहोत त्यात ज्या अटीशर्ती दिल्या होत्या त्यात ३८ फॉर्म आपल्याकडे भरुन आले होते. डॉ. बावस्करांनी सांगितले होते ४८ तासात नियमात बसतात त्यांना आपण लायसन्स देणार, तर आपण किती लोकांना लायसन्स दिले आहे. अटीशर्तीचे निकष काय आहे.

**मा. सभापती:-**

संबंधित खात्याच्या अधिकाऱ्याने येऊन उत्तर द्यावे. सचिवजी अधिकारी सभेला हजर राहत नाहीत. आपण त्यांच्याकडे सभेचा अजेंडा पाठविला आहे का?

**प्र.सचिवः-**

सभेचा अजेंडा संबंधित सर्व खात्यांना देण्यात आलेला आहे.

**लिओ कोलासोः-**

शहरामध्ये मिरा रोडमध्ये कावीळीची साथ पसरली आहे हे आपल्याला ऐकायला मिळत आहे. कावीळच्या आजाराचा प्रश्न आहे. माणसांच्या आजाराचा प्रश्न आहे. आरोग्य अधिकाऱ्यानी सभेत उपस्थित राहायला पाहिजे. आरोग्याशी संबंधित जे प्रश्न असतील त्याचे निरसन तेच देऊ शकतील ना? वैतींजीनी विचारलेल्या प्रश्नांशी मी सहमत आहे. किती मटण दुकानांना मांस विक्री परवाने दिले गेले त्याची माहिती आम्हाला मिळायला पाहिजे. उपआयुक्त साहेब पुर्वी जे शिक्षण अधिकारी आले होते ते फक्त दोन आमसभेला उपस्थित राहिले आणि स्थायी समितीमध्ये चौदा सभेपैकी फक्त एक सभेला उपस्थित राहिले. जर अधिकाऱ्यांना एवढे स्वारस्य नसेल तर आम्हाला त्यांच्याबद्दल सभेत बोलायला लागेल. जर अधिकारी सभेत उपस्थित राहतील तर आम्हाला त्यांच्यामुळे नवी दिशा मिळेल व चांगले योगदान मिळेल. मी मागच्या वेळेला त्यांना विचारले होते आपण स्थायी समितीमध्ये उपस्थित नव्हता. त्यावर त्यांनी उत्तर दिले की मला अजेंडा मिळाला नाही. स्थायी समितीमध्ये आपण शहराच्या विकासाकरिता चर्चा करण्यासाठी, निर्णय घेण्यासाठी बसलो आहोत. त्यात प्रत्येकाने उत्साहाने काम करायला पाहिजे. असे जे बाहेरुन अधिकारी येतात आणि कामात ते उत्साह घेत नसतील तर आमचे जे स्थानिक अधिकारी आहेत त्यांना आपण प्रमोट करा आणि त्यांना वरची पदे द्या.

**महेंद्रसिंग चौहानः-**

इससे पहिले जो अधिकारी यहाँ पर आया था उसका नाम कितना खराब हुआ है । वह शिक्षण अधिकारी ॲन्टी करप्शन की और से पकडे गए और उनको काम से बाहर जाना पडा । नगरपालिका का काम व्यवस्थित चले इसलिए दुसरा अधिकारी यहाँ पर आया । और वह शिक्षण अधिकारी क्या कर रहाँ है, वही रस्ता अपना रहा है क्या? शिक्षण शहर का बडा अंग है और उसपर हमने कितना बडा इनवेस्टमेंट किया लेकीन उसका रिझल्ट क्या? वह एक शिक्षण अधिकारी बाहर से आया और चला गया । स्कुल चालु हो रहा है । स्कुल में कोई भी प्रॉब्लेम आ सकती है । आप उस शिक्षण अधिकारी को शोकास नोटीस दिजीए ।

**मा. सभापतीः-**

सचिवजी आपण नोटीस काढा की हेड ऑफ डिपार्टमेंटने सभेला उपस्थित राहिले पाहिजे व जेवढे अधिकारी आहेत त्यांना सभा संपेपर्यंत कार्यालयाच्या बाहेर जायचे नाही आणि जर त्यांना बाहेर जायचे असेल तर तशी पूर्वसुचना त्यांच्याकडून यायला पाहिजे.

**चंद्रकांत वैतीः-**

लायसन्ससाठी निकष काय लावणार आहात. आमसभेमध्ये आपण नियमावली तयार केली होती. मटणाच्या दुकानापासून पन्नास मिटरच्या अंतरावर मंदिर किंवा शाळा नको. आपण जे निकष लावत आहात ते प्रमुख रस्त्यावर नको. दुकानांना काचा पाहिजे, मटण उघड्यावर टांगण्यात येऊ नये अनेक नियम होते. सर्वांना त्याची माहिती आहे. आम्हाला अजुनही बरेचसे लोक येऊन भेटतात व सांगतात आम्ही नियमाची पुर्तता केली आहे. तर आपणाकडुन एवढा विलंब का झाला. आपण सांगितले होते ना की ४८ तासाच्या आत जे नियमात बसत असतील त्यांना लायसन्स देण्यात येईल असे.

**संदिप शिंदेः-**

आपणाकडून अजून लायसन्स देण्यात आलेले नाही. अर्ज प्राप्त होतील व कम्प्लाईन रिपोर्ट येईल त्यावेळी आपण त्यांना लायसन्स देणार आहोत.

**चंद्रकांत वैतीः-**

आम्ही नगरसेवक आहोत. आम्ही नेतेगीरी करतो व जाहिरपणे लोकांना त्यांचे काम होईल असे आश्वासन देतो. अधिकाऱ्यांनी अशी आमच्या सारखी नेतेगीरी करु नये. तो अधिकारी ह्या नियमाशी व वस्तुस्थितीशी बांधिल राहिला पाहिजे. आपण काय लायसन्स खैरात करणार नाही. त्या लोकांच्या मनात असुरक्षततेची भावना निर्माण झाली आहे. त्यांना येथे सारखे सारखे येरझारा घालायला लावणे हे बरोबर नाही. आपण त्यांना सुस्पष्टपणे समजावुन सांगायला पाहिजे. किती वेळ लागणार आहे ते. स्थायी समितीने कामाला मंजुरी दिल्यावरच अधिकारी काम करतात. आपल्याला ऐकायला मिळत असते नगरसेवकांवर कार्यवाही होते. जसे कल्याण-डोंबिवली, ठाणे महानगरपालिकेचे आपण ऐकलेच आहे. आपण मिरा भाईंदर शहराच्या विकासासाठी काम करत आहोत. पण पाणी विभागाबाबत जास्त असंतोष पसरला आहे. डी.एम.सी. साहेब आपण चार्ज स्विकारल्यानंतर मी स्वतः ह्याबाबत आपल्याला काय परिस्थिती आहे हे सांगितले. काही लोकांचे

पाण्याच्या बाबतीत अडचणी असतात व त्यांना आपल्याकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नाही. म्हणून ते आमच्याकडे त्यांची कळकळची विनंती घेऊन येतात. येथे पाणी आमच्यामुळे आले असे कोणीही फुशारकी मारु नये. पाणी येथे कोणी आणले समाजकर्त्यांनी, आमदारांनी आणले. मी येथे पाणी विभागाचा अधिकारी आहे आणि मी पाणी आणले असे कोणीही शेकी मिरवु नये. अशा अधिका-यांना परत त्यांना त्यांच्याजागेवर पाठविण्याचा विषय घेतला जाईल. अशा अधिका-यांवर टॅप लावले पाहिजे का?

**मा.केळकर (उपआयुक्त):-**

पुढल्या सभेपासून सर्व हेड ऑफ डिपार्टमेंट स्थायी समिती आणि आमसभेच्या बैठकीला उपस्थित राहतील असे मी आपणांस शाश्वती देतो.

**मिलन म्हात्रे:-**

सभापती साहेब नसताना सभा कशी चालेल.

**चंद्रकांत वैती:-**

महेंद्रसिंग चौहानजी सभापती साहेब आनेतक आप वहाँपर बैठीए । मेरा अनुमोदन है ।

**महेंद्रसिंग चौहान:-**

आप सब लोगो को धन्यवाद । आप सबने यहाँ पर बैठनेके लिए मुझे कहाँ इसबातकी कद्र करके मैं यहाँपर बैठता हूँ ।

**मिलन म्हात्रे:-**

कोलासो साहेबांनी सांगितले त्याच्यामध्ये त्यांनी कावीळीचा उल्लेख केला आहे. पण शहरात लोकांना गॅस्ट्रो, मलेरिया ह्याचा सुद्धा प्रार्दुभाव झाला आहे. हॉस्पिटलमध्ये जाऊन त्यांच्या विभागाने पाहणी केली का कुठल्याप्रकाराचे रुग्ण आले आहेत. मागे एका आठवड्या अगोदर जे पाणी येत होते त्याला गटाराच्या पाण्यासारखा वास मारत होतो. त्या पाण्यामध्ये तुरटी फिरवल्यानंतर गाळ खाली बसला. हा प्रकार जो प्रकार चालला आहे. तो नुसता मिरा रोड पुरता नाही. आपण ह्यावर सोल्युशन काढा.

**महेंद्रसिंग चौहान:-**

ह्यावर सोल्युशन काढणे अत्यंत गरजेचे आहे.

**मिलन म्हात्रे:-**

पाण्यात जर क्लोरीन टाकले तर लगेच कळते. आपल्याकडुन पाणी फिल्टर केले जाते ते कसे केले जाते हे देखील आम्हाला कळत नाही. हा विषय म्हणजे कोणी कोणावर टिका करणे हे योग्य नाही. तर प्रश्न असा आहे आपल्याकडचे जे कनेक्शन दिले आहे ती नव्याने कामे फायर हॅट्रेट बरोबर होत नाही. मेन रोडला खणुन पाईप वगैर फोडले जातात. जवळ जवळ एक महिना झाला मी पत्र देखील दिले आहे. फायर हॅट्रेट आहे त्याचे काम अजुन बरोबर होत नाही. त्याला अजुन वर कपलिंग लावलेले नाही ते तसेच उघडे आहे.

**लिओ कोलासो:-**

पाईपच्या संदर्भात चर्चा होत असताना शहरात ज्या काही गोष्टी होतात ते चांगले व्हायला पाहिजे असे आमचे म्हणणे आहे. पाण्याच्या संदर्भात पाणी जनतेपर्यंत पोहचविण्याचे कर्तव्य आपले आहे व कायद्याने बंधनकारक आहे. उत्तन कडच्या पाण्यामध्ये अस्वच्छता दिसली आहे. आपल्याकडे साहित्य आहे आपण पावडर आणली आहे औषध आणले आहे. पण त्याचे प्रमाण कसे वापरायचे हे नीट त्यांना माहित नाही असे दिसते. आपण दुसरी - तिसरी शिकलेली माणसे वॉलमन ठेवली आहे. त्याला देखील ते वॉल किती प्रमाणात फिरवायचे त्याची माहिती नसते. ह्यावेळी अधिका-यांनी लक्ष घातले पाहिजे ह्याच्याशी माझा काय संबंध नाही असे बोलुन चालणार नाही. सगळ्या नागरिकांना जो त्रास होत आहे. त्याला आपण जबाबदार आहोत. आपण ह्या गोष्टीकडे लक्ष घाला. केळकर साहेब आपणाला या शहराची माहिती आहे. आपणाकडे उपआयुक्त पदाचा दर्जा आहे. आपण अधिका-यांना कामावर लावा व आम्हाला सहकार्य करा.

**महेंद्रसिंग चौहान:-**

कही खड्डा पडा हुआ है । कही कुछ हो रहा हो । जहॉ जहॉ से ऐसी कम्प्लेंट मिलती है वहॉ आपके अधिकारीने फौरन जाकर चेक करना चाहिए । नगरपालिकाका पाणी खराब आता है । इस तरह की सुचना मेरे भी पास है । पाणी की वजह से लोगों को बिमारिया हो रही है ऐसे डॉक्टर साहब बताते है । अभी बारीश का वक्त है इसलिए यह तीन महिने तक काम सही से करो क्योंकि पाईप फुटने की गंदा पानी पाईप में जाने की संभवतः इस वक्त जादा होती है । उसी तरह जगह जगह गॅस्ट्रो हो रहा है । वहा पर जाकर ढंगसे काम करो । पाणी में बहुत मिक्सिंग हो रहा

है । इसके लिए आप पथक बनाईये और जहॉ पर यह कम्प्लेंट आती है वहॉ पर जाकर देखिए की क्या समस्या है ।

**दशोरेः-**

९५ कि.मी दुरुन पाणी येते त्याच्यामध्ये क्लोरीनचे प्रमाण फार कमी होते. अस्मिता, सिल्व्हर पार्क, डी.एम.सी. ह्या ठिकाणी पुढच्या चार दिवसात आम्ही इन्स्ट्युमेंट पाठवणार आहोत.

**मिलन म्हात्रेः-**

आज संध्याकाळ पासुन काय करणार आहात.

**दशोरेः-**

डी.सी.एल. चे काम चालु आहे.

**जेम्स कोलासोः-**

पान क्र.७ वर ह्याच्यामध्ये बी.एस.ई.एस चे स्ट्रीट लाइटचे प्रपोझल पेंडींग आहे. त्याची कम्प्लाईंन रिपोर्ट आली आहे का?

**मा. सभापतीः-**

रिपोर्ट आली आहे.

**दिपक खांबीतः-**

३४९ पोलचे रिपोर्ट आले आहे.

**जेम्स कोलासोः-**

ते पोल कधी बसले आहे.

**दिपक खांबीतः-**

३१-४९ प्रपोझल पेन्डीग आहे.

**लिओ कोलासोः-**

बी.एस.ई.एस ने एक स्टेटमेंट केले आहे. एस. एल. ह्यावर्षामध्ये एवढेच घेतले पाहिजे हे असे कसं दिले. आपली हजार पोलची मागणी आहे त्यांनी पुर्ण केली पाहिजे.

**मिलन म्हात्रेः-**

रिलायन्स तर्फे बी.एस.ई.एस चा प्रोजेक्ट घेतला आहे. त्याच्यामध्ये नविन खर्च येणार आहे. माझ्या वार्डामध्ये कित्येक दिवस लाईट बंद आहे. मी स्वतः बी.एस.ई.एस. मध्ये सतत जात असतो. तुम्ही सांगतात नगरपालिकेतर्फे प्रस्ताव पाठविले जातात पण मी त्यांना विचारल्यावर त्यांनी सांगितले की आमच्याकडे प्रस्ताव आलेला नाही. भाईंदर फिरल्यानंतर असे दिसण्यात आले की जे पहिल्याचे प्रोजेक्ट आहे ते तसेच ठेवता नंतरच्या प्रोजेक्टमध्ये लाइटचे काम करण्यात आले आहे असे आपल्याकडुन का होते. आमचे म्हणजे फक्त असे आहे ज्यांचे प्रपोझल आधी दिले आहे त्याचे काम आपण आधी घ्या व नंतरचे काम नंतर घ्या. आम्ही नोव्हेंबर महिन्यापासुन बोलतोय आपल्याकडे मटेरियल नाही.

**तुळशीदास म्हात्रेः-**

आपण जे लोक ह्याकामासाठी नेमले आहे. त्यांचा आपण रिपोर्ट दया. आमच्या येथे पण लाईट बंद आहे.

**दिपक खांबीतः-**

ज्याठिकाणी लाईट तीन दिवसांच्यावर बंद असेल तर आपण त्यांचे पैसे कापतो.

**मिलन म्हात्रेः-**

डेटवाईज आपण प्रपोझल घ्या.

**लिओ कोलासोः-**

आपण कंपनीला खुलासा विचारा किंवा शासनाला आपण तक्रार करावी की, ही कंपनी आम्हाला सहकार्य करत नाही.

**मिलन म्हात्रेः-**

आमच्या येथे आयुक्त साहेब अधिकारी येऊन गेले. पाच वेळा सर्वे केला आणि तरीही अजून बत्ती लागलेली नाही.

**मा. सभापतीः-**

रिपोरटिंग काय आहे.

**मा. केळकर(उपआयुक्त)ः-**

नगरपालिका असताना दर गुरुवारी सभा व्हायची तशी सभा आता का होत नाही.

**शरद पाटील:-**

पान क्र. २० वर झोपडपट्टी नळ कनेक्शन स्वतंत्र देण्याबद्दल आम्ही विरोध केला होता तो विरोध ह्याच्यात नोंदविला गेला नाही. आमचा विरोध आहे तो आपण घ्या व इतिवृत्तांतामध्ये त्याची नोंद व्हायला पाहिजे. नोंद घेण्यात यावी.

**मिलन म्हात्रे:-**

आरक्षित प्रभाग आहे. त्याचे डेफिनेशन पूर्णपणे चुकीच दिले आहे. अहो, मी धावगीच्या उत्तनमधील आरक्षित विभागाचा देखील उल्लेख केला होता.

**शिवप्रकाश भुदेका:-**

इसपे बहुत चर्चा हुअी थी ।

**मा. सभापती:-**

आपला विरोध आहे. आम्ही आपला विरोध नोंदवून घेतो.

**शरद पाटील:-**

हा विषय महासभेला न्यायचा असे ठरले होते ना.

**मा. सभापती:-**

आपला ह्या विषयाला विरोध आहे. व तो विरोध आम्ही नोंदवुन घेतला आहे.

**मिलन म्हात्रे:-**

डी.एम.सी. साहेब अन्य प्रकरणामध्ये मला सांगितले गेले तो ठराव झाला आहे. परंतु इतिवृत्तांला मान्यता मिळाली नाही. त्यामुळे त्या ठरावाला मान्यता देता येणार नाही. त्या इतिवृत्तांला मंजुरी मिळाल्यानंतर त्याच्यानंतर आपली इम्प्ली्मेंटेशन होते.

**ज्योत्स्ना हसनाळे:-**

आपल्याकडे किती टेंडर यायच्या अगोदर बांधकाम चालु होते असे किती प्रकरण मी तुम्हाला येथे दाखवू.

**मा. सभापती:-**

म्हात्रे साहेब तुमच्या सभा शास्त्रामध्ये असे काय आहेते आपण आम्हाला दाखवा.

**मिलन म्हात्रे:-**

आपण रुलिंग द्या सभापती साहेब की असे असे होते इतिवृत्तांला मंजुरी दिल्यानंतर ठरावाचे इम्प्लीमेंटेशन होते, का अगोदर काम चालू होते ते आपण आम्हाला सांगा.

**मा. केळकर सो.(उपआयुक्त):-**

स्थायी समिती किंवा महासभेमध्ये जे बोलले जाते व जे विषय असतात त्याचे इम्प्लीमेंटेशन संबंधित विभागाकडुन होते. व इतिवृत्तांत म्हणजे आपला एखादा शब्द आलेला नाही त्याची दुरुस्ती आपण करतो इतिवृत्ताला मंजुरी देताना.

**मिलन म्हात्रे:-**

दलित वस्ती करिता ठराव पास झाला. पाण्याच्या विषयामध्ये आम्ही सभेला खाजगी स्वरुपाचे नळ कनेक्शन मंजुर करा असे बोलले गेले. पैसे देवुन कनेक्शन आम्ही मागतोय. तुम्ही जे दलितवस्तीला कनेक्शन देताहेत त्याला आमचा विरोध नाही ते आदिवासी समाजातील आहेत का? दलित आहेत का? त्याचा आपण सांगोपांग विचार केला का? तुम्ही त्यांचे दाखले बघितले का? दाखल्याशिवाय तुम्हाला कनेक्शन देता येत नाही. कोणीही उठावे आणि काहीही करावे हे योग्य नाही. उत्तनच्या येथील धावगीच्या वस्तीचा उल्लेख केला आहे मी. माझे स्टेटमेंट आहे. त्या वस्तीचे काय? सभापती साहेब मला रुलिंग पाहिजे.

**दशोरे:-**

फक्त आपण राखीव प्रभागाला कनेक्शन देणार आहोत.

**मिलन म्हात्रे:-**

साहेब माझ्याकडे पण आदिवासी प्रभाग आहे. माझ्याकडे ओ.बी.सी. राखीव प्रभाग आहे.

**शिवप्रकाश भुदेका:-**

आपने जो रहिवासी बोला है उसमें पुरा झोपडपट्टी आता है ।

**मिलन म्हात्रे:-**

अ.ब.क. मध्येही आमच्याकडे ओ.बी.सी. राखीव आहे.

**लिओ कोलासो:-**

असा ठराव करताना आपण काय गृहीत धरले आहे. त्याठिकाणी राखीव मतदार संघामध्ये प्राधान्य कुणाचे आहे.

**मिलन म्हात्रेः-**

जो राखीव प्रभाग आहे तो इलेक्शनपुरता आहे. उत्तनला जो प्रभाग आहे तो आपण घेणार काय? मी तुम्हाला पुण्याचे पुस्तक ही दिले होते. घोडबंदर, काजुपाडा, पेणकरपाडा तिथे कनेक्शन द्यायला पाहिजे ते कसे देणार. १.१.९५ चे आधीची झोपडपट्टी असेल तर तुम्ही कनेक्शन देता तर आमच्याकडे देखील कनेक्शन दिले पाहिजे.

**मा. सभापतीः-**

अजुन किती तुम्ही ह्याविषयावर बोलणार.

**मिलन म्हात्रेः-**

डी.एम.सी. साहेब मला ह्या विषयावर रुलिंग पाहिजे.

**मा. सभापतीः-**

हा जो ठराव केला आहे तो राखीव प्रभागाकरिता केला आहे. प्रत्येक प्रभागामध्ये राखीव जागा आहे. ज्या प्रभागातुन निवडणुका लढलो आहे त्याच्यात ओ.बी.सी. आहे, मागासवर्गीय आहे. राखीव म्हणजे आदिवासी असे आहे.

**लिओ कोलासोः-**

इलेक्शनच्या पॅटर्नप्रमाणे राखीव मतदार संघ सांगा.

**प्र. सचिवः-**

प्रभाग क्र. १० व ११.

**शरद पाटीलः-**

आपण बोलला होता की हा विषय महासभेपुढे घेणार आहोत.

**चंद्रकांत वैतीः-**

सन्मा. सभापती साहेंब, सन्मा. डी.एम.सी. साहेब व ह्याच्यामध्ये फेरविचार करणे असा हा विषय होता. झोपडपट्टी विभागात पाणी कनेक्शन देताना ग्रुप कनेक्शन द्यावे असे तत्कालिन आयुक्त यांनी जाहिर केले होते. वैयक्तिक नळ कनेक्शनची आवश्यकता आहे असे काही नगरसेवकांनी प्रुफ करुन दिले. आदिवासी रहिवासी हा एक शब्द आहे. काजुपाडा, पेणकरपाडा, वर्सोवा, चेना, डाचकुलपाडा, माश्याचा पाडा, गावठण असे एकुण १२ ते १५ वस्त्या आदिवासी आहेत. आपण ग्रुप कनेक्शन ह्याकरीता दिले कारण ती लोक सक्षम नाहीत. आणि ही आदिवासी लोक वैयक्तिक नळ कनेक्शन घेण्यास सक्षम आहेत का? ह्या आदिवासींचे दाखले जातीने पडताळणीने करणे क्रमप्राप्त ठरते. जर दिलेल्या ह्या वस्त्या बरोबर नाहीत तर ह्या फाईल परत चेक कराव्या. आपण तर ह्यात दुरुस्ती करणारच आहोत तर तो ठराव आपण महासभेपुढे आणावा. ह्या विषयाला खरंतर भाजपाने पुर्णपणे ह्याला विरोध केला होता. आदिवासी कॉमा रहिवासी आपण केला आहे. त्याऐवजी आदिवासी रहिवासी हा एक शब्द पाहिजे ही दुरुस्ती आपण करुन घ्या. मग त्याच्यासाठी आपण आर्थिक निकष काय लावणार आहात हे काय ठरविले नाही. शासनाच्या दराप्रमाणे आपण किती रेट लावणार आहोत.

**शिवप्रकाश भुदेकाः-**

आपण हा ठराव रद्द करा.

**ज्योत्स्ना हसनाळेः-**

हा ठराव रद्द करता येणार नाही. आपण आपला विरोध नोंदवा.

**महेंद्रसिंग चौहानः-**

जिस तरह हम आदिवासी लोंगो के लिए कुछ कर रहे है उसी तरह झोपडपट्टी का विषय था । झोपडपट्टी के लिए भी हमें कुछ करना चाहिए । झोपडपट्टी में जो स्टँड पोस्ट है वह आप रद्द मत किजीए ।

**मा. सभापतीः-**

झोपडपट्टी स्टँड पोस्ट रद्द करायचे नाही. शहरातील स्टँड पोस्ट रद्द करायचे आहे.

**शशिकांत शहाः-**

आम्हाला पत्र दिले आहे. त्याच्यात स्पष्ट लिहिले आहे.

**मिलन म्हात्रेः-**

आपण ग्रुप कनेक्शनबद्दल बोलता ते फॉर्म अजुन आलेले नाही.

**मा. केळकर सो. (उपआयुक्त)ः-**

आदिवासी रहिवाशी शब्दामध्ये आपण जो कॉमा टाकला आहे, तो कॉमा आपण काढुन टाकावा व आदिवासी रहिवासी एक शब्द करावा.

**शिवप्रकाश भुदेका:-**

आदिवासींके नामपर अगर दुसरे लोगोंने कनेक्शन लिया तो उसपर कार्यवाही होनी चाहिए ।

**मा. सभापती:-**

आता जे कनेक्शन झाले असतील ते कनेक्शन राहु दे. पुढच्या महासभेमध्ये विषय घ्या.

**शरद पाटील:-**

आदिवासींच्या खेरीज दुसऱ्या कुणालाही कनेक्शन द्यायचे नाही.

**मा. सभापती:-**

वार्ड क्र. १० व ११ ह्या प्रभागातील झोपडपट्टीसहित.

**शरद पाटील:-**

आपण विषय महासभेत घेणार आहोतच ना.

**लिओ कोलासो:-**

शहरवासियांना पाणी देणे हे आपल्या क्रमप्राप्त आहे. आणि ही चांगली गोष्ट आहे. प्रत्येक झोपडपट्टीतील प्रत्येक माणसाला पाणी मिळाले पाहीजे. आपण जर प्रत्येक ठिकाणी कनेक्शन देण्याकरिता पाईप टाकत गेलो तर समस्या निर्माण होणार अशी आपली भुमिका होती. नळ कनेक्शन देताना आपण रिझरवेशन ठिकाणी द्यावे असा ठराव झाला होता. व झोपडपट्टी आहे तिथे ही मागासवर्गीय आहेत त्यांना ही कनेक्शन द्यावे असे ठरले होते.

**मिलन म्हात्रे:-**

सभापती साहेब तुम्ही रुलिंग दिली होती मला चांगले आठवते. दशोरे साहेबांनी जे कनेक्शन दिले होते ते कनेक्शन हा ठराव पास करण्याच्या अगोदर कनेक्शन लावले गेले होते. त्याच्यामध्ये ते कनेक्शन आज संध्याकाळपर्यंत कापा असा आदेश दिला होता. एकीकडे तुमचे असे रुलिंग आहे व आता आपण असा आदेश देता.

**लिओ कोलासो:-**

संध्याकाळपर्यंत नळ कनेक्शन कापावे असे झाले होते. त्याचे काय केले.

**ज्योत्स्ना हसनाळे:-**

माझ्या प्रभागाचे त्यांना जसे ती कनेक्शन दिली आहेत. तसेच आमच्या प्रभागातील सर्व लोकांना कनेक्शन द्या अशी मी तुम्हाला विनंती केली होती. माझ्या प्रभागामध्ये ती कनेक्शन कोणी लावली काय लावली ते मला माहित नाही. ते कनेक्शन तसेच राहु दे.

**महेंद्रसिंग चौहान:-**

यह मुद्दा अलग रखे ।

**मा. सभापती:-**

जे इतर झोपडपट्टीचे विषय आहे तो विषय महासभेपुढे घ्यावा आपण हा जो ठराव पारित केला तो १० आणि ११ प्रभागासाठी मंजुर केला आहे.

**मिलन म्हात्रे:-**

डी.एम.सी. साहेब किती नळ कनेक्शन दिली गेली आहेत ते आम्हाला सांगा.

**मा. सभापती:-**

तुम्ही ठराव प्रसिद्ध करताना आदिवासी घटक ऑबलिक काढुन टाका व प्रभाग क्रमांक १० व ११ लिहा.

**शरद पाटील:-**

आदिवासी नसतील त्यांना तुम्ही दयाल का?

**मा. सभापती:-**

आपण विषयांतर करु नका. प्रभाग क्र. १० व ११ आपण रिझरवेशन म्हणुन घोषित केले त्या प्रभागाकरिता आपण ठराव पारित केला आहे व इतर झोपडपट्टी विषय हा तो आमसभेपुढे पाठवुन दया.

**शरद पाटील:-**

भाजपाचा विरोध आहे त्याची नोंद घेण्यात यावी.

**लिओ कोलासो:-**

कनेक्शन दयायला सुरुवात केली आहे. एकंदरीत किती कनेक्शन दिली आहे ते आपण आम्हाला सांगा.

**दशोरे:-**

पंधरा फाईल दिले आहेत. पाच हजार रुपये डिमान्ड नोटचे पैसे आपण स्विकारले नाही.

**दिनेश नलावडेः-**

पान नं. २५ वर जैन मंदिराच्या येथील मागचे अतिक्रमण हटविण्याचा विषय आहे ते अतिक्रमण हटविले का?

**केसरीनाथ म्हात्रेः-**

दोन्ही गाळ्यामधील अतिक्रमण हटवुन त्यांना दुसरीकडे बसविले होते. पण ते पुन्हा परत तिथे आले आणि परत त्यांना हटवण्यासाठी पोलीस बंदोबस्त मागितला तो मिळाला नाही आणि पोलीस बंदोबस्त मिळाल्यावर सोमवारी तेथुन पुन्हा अतिक्रमण हटविले होते. काशी मिरा रोडचे अतिक्रमण हटविले आहेत.

**दिनेश नलावडेः-**

तुम्ही त्यांच्या गाड्या उचलुन आणता त्यांच्याकडुन किती दंड घेता व किती गाड्या हटविल्या आहेत. त्यापेक्षा तुम्ही त्यांच्या गाड्या तोडुन टाका.

**केसरीनाथ म्हात्रेः-**

बाराशें रुपये घेतो. व किती गाड्या हटविल्या आहेत ते माहिती घेऊन सांगतो.

**दिनेश नलावडेः-**

माहिती चुकीची देताहेत. तिकडच्या गाड्या हटविल्या नाहीत व गाड्याही जप्त केल्या नाहीत.

**शशिकांत शहाः-**

मंदिराच्या ट्रस्टने लेटर दिलेले आहे. फेरीवाले, दुकाने, गाड्या परत परत लागतात. प्रत्येक स्थायी समितीमध्ये आपण ह्याच विषयावर बोलतो. ह्याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे.

**मा. सभापतीः-**

हा विषय प्रत्येक सभेत येतो. तुम्ही गाड्या उचलता. तुम्हाला किती रेव्हेन्यु मिळाला आहे.

**तुळशीदास म्हात्रेः-**

माहिती घेऊन देतो.

**महेंद्रसिंग चौहानः-**

सबकी गाडीया तोड दो यह बराबर नही है । जैन मंदिर के पिछे कितने लोग बैठते है उनकी गिनती करके हम उन्हें सहयोग करना चाहिए । वहाँ मंदिर के पिछे एक राऊंड सर्कल है। वहाँ पर ५० गाडीया हटानी है तो हटाईए ।

**लिओ कोलासोः-**

शशिकांत शहा आणि चौहान साहेब याविषयावर सारखे बोलतात. आपण आम्हाला याविषयावर खात्याचे प्रस्ताव काय आहे?

**चंद्रकांत वैतीः-**

बावन जिनालय हे महाराष्ट्रातील एकमेव असे मंदिर आहे. आणि जैन बांधवाचे भावनेचा प्रश्न आहे. कोर्टाची ऑडर आहे त्या गोष्टीसाठी मंदिराची हमी दिली आहे. रस्त्याच्या डाव्या बाजुला बसवायचे असे आपण त्यांना सांगावे. आणि आपण गाड्या उचलुन आणतात आणि ते येऊन आपल्या गाड्या सोडवुन जातात व पुन्हा त्या ठिकाणी येऊन बसतात तर आपण देखील त्यांच्या गाड्या पुन्हा उचलुन आणावी. दर वेळेला ह्याविषयावर चर्चा करायची आणि फक्त बोलतच राहायचे काय. जर तुमच्यावर कुणाचा दबाव आहे तर तसं आम्हाला सांगा.

**मा. केळकर सो.(उपआयुक्त)ः-**

सन्मा. सदस्य चौहानजी आणि शशिकांत शहाजी आपल्या सर्वांच्या भावना लक्षात घेऊन ह्या सन्मा. सदस्यांनी ज्या जागेचा प्रस्ताव ठेवला आहे. त्या जागेचा आज दुपारी ४.०० वा. सर्वे करुन मी, केसरीनाथ म्हात्रे आणि नाईक साहेब आजच्या आज निर्णय घेऊन लवकरात लवकर अतिक्रमण काढुन टाकण्याची कार्यवाही करु.

**ज्योत्स्ना हसनाळेः-**

काशी मिरा रोडचे काय केले.

**केसरीनाथ म्हात्रेः-**

मंगळवारी १/७/०३ आणि ३/७/०३ ला अतिक्रमण हटविले आहे.

**मिलन म्हात्रेः-**

पोलीस स्टेशनच्या बाजुला आपण त्या गाड्या हटवा. जनता नगरचा रस्ता आहे. नील कमल हॉटेल पासुन तो रस्ता फेरीवाल्याचा नाही. तिथे पण बसतात तेथुन पण हटवा. काल एक कुणाची तरी गाडी उचलुन आणली व त्याच्या बाजुच्या गाड्या उचलुन आणल्या नाही. त्यामुळे लोकांमध्ये गैरसमज होतो.

**शरद पाटील:-**

वीस तारखेपासुन कार्यवाही करा असे रुलिंग दिले होते.

**केसरीनाथ म्हात्रे:-**

आपण वीस तारखेपासून कार्यवाहीला सुरुवात केली आहे.

**महेंद्रसिंग चौहान:-**

स्थायी समिती की शिकायत है कभी भी काम का फॉलअप नही होता है I यह विषय जो है उसमें आप कितनी बार गाडीया हटाएंगे I इसके लिए एक रास्ता है जो रोड है, उसके बिलकुल सामने जो रोड है वहाँ पर किसका भी ऑबजेक्शन नही है I

**लिओ कोलासो:-**

एम.आर.टी.पी. की लिस्ट चाहिए I

**महेंद्रसिंग चौहान:-**

हमारे सामने रिपोर्ट आना चाहिए I

**मा. केळकर सो. (उपआयुक्त):-**

रिपोर्ट पुढच्या सभेपुर्वी देण्यात येईल.

**शशिकांत शहा:-**

आपण जो ठराव करतो त्याची जाहिर सुचना दयावी.

**मिलन म्हात्रे:-**

बाजार लिलाव घेतले जातात. त्या ठिकाणचे फेरीवाले उठविणार आहेत. त्यामुळे बाजार रक्कम कमी होणार आहे. त्याचा विचार कोणीही करत नाही. जर तुमच्या पक्षाचे नगरसेवक ठराविक भुमिका घेत असेल तर त्यांच्यावर तुम्ही बोलायला पाहिजे. आपली बैठक आहे की नाही ते आपण मला सांगा. तुम्ही प्रत्येक वेळी ठराव पास करा व नंतर तुम्ही परस्पर काहीतरी ठरवायचे ते बरोबर नाही.

**लिओ कोलासो:-**

शहरात बाजाराचा लिलाव घेताना नो हॉकर्स झोन लिलाव केला होता. ह्याच्यावर चर्चा झाली होती. हे तुम्ही बोलता ते बरोबर नाही.

**महेंद्रसिंग चौहान:-**

पर्टिक्युलर एरिआ का एक झोन क्लिअर करो ऐसा किजीए I

**मिलन म्हात्रे:-**

भाजी मार्केटचे रिझर्वेशन आहे. त्याच्या बद्दल कोणीच बोलत नाही. साहेब दोन जागेवरची रिझरव्हेशन काढले गेले आहे.

**महेंद्रसिंग चौहान:-**

आपके यहाँ सक्षम अधिकारी आए हुए है इस तरह की सुचना लेने को उन्हें कहो, जहाँ जहाँ रिझरव्हेशन है उसे आप डिक्लर करो I

**मिलन म्हात्रे:-**

आम्ही कित्येक वेळा पत्र व्यवहार केला आहे. त्याच्यावर आपल्या कडुन काहीच निर्णय आलेला नाही. दोनशे ते अडीचशे फेरीवाले दिले आहे. रामगल्ली येथे देखील व्यवस्थित कार्यवाही होत नाही.

**महेंद्रसिंग चौहान:-**

आपण कार्यवाही करायला पाहिजे.

**दिनेश नलावडे:-**

आज नवघर रोडची हालत कशी झाली आहे. रोजच्या रोज फेरीवाले वाढताहेत.

**तुळशीदास म्हात्रे:-**

नेहमी नेहमी एका विषयावर चर्चा होत आहे. व स्थायी समितीला काही अर्थ राहणार नाही. महाराष्ट्रात पंधरा वर्ष झालेल्या लोकांना आपण लायसन्स देणार आहोत मग आपण ठराव कशाला करता. स्थानिक लोकांना प्राधान्य देण्यात आले पाहिजे. फेरीवाले वाढु नये म्हणुन आपण पंधरा वर्षाची जी अट लावली आहे. त्या अटीनुसार लायसन्सची कार्यवाही लवकरात लवकर करा.

**प्रकरण क्र. ८८:-**

दि. १७/५/०३ ची तहकुब सभा दि. २१/५/०३ व २८/५/०३ चे मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ७६ :-**

दि. १७/५/०३ ची तहकुब सभा दि. २१/५/०३ व २८/५/०३ चे मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणेंस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हरेश गावंड. अनुमोदन :- श्री. शशिकांत शहा.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा.सभापतीः-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा येथे तहकुब करण्यात येते असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०१.३० वाजता.**
**दिनांक :- ०५/०७/२००३.**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रभारी सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**